N.A.

Shri Varad shanker deota chakram

श्रीवरशंकर देवता चक्रम्

Marathi

Paper – Printed

1808 Sakabda (132 years old)

26+8 Folio

9.6" X 4.3"

Complete

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अथश्रीवरदशंकरदेवताचक्रम्

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः॥ ॥शौनकादिक ऋषि प्रश्न करतात हे सूता हे सूता, तूं महान् ज्ञानसंपन्न असून पुराणांतील ज्ञानाचा केवळ सागर आहेस; यास्तव कलियुगांत जेणें करून कल्याण होईल असें उत्तम पुण्यकारक आख्यान सांग. १. तें असें कीं, सर्व कल्याणांत श्रेष्ठ असून कल्याण करण्याविषयीं अद्भुत, इच्छित मनोरथ देणारें आणि स्वल्प आयास असून महत्फलदायक असें कांहीं कथन कर. २. या

श्रीगणेशायनमः॥ ऋषयऊचुः ॥ सूत सूत महाप्राज्ञ पुराणज्ञानसागर ॥ वदाख्यानं सुपुण्यं च येन श्रेयो भवेत्कलौ ॥ १ ॥ श्रेयसां यद्भवेत्सारं कल्याणकरमद्भुतम् ॥ वाञ्छितार्थप्रदं ब्रूहि स्वल्पायासमहाफलम् ॥ २ ॥ इह घोरे कलौ प्राप्ते दुःखशोकभयप्रदे ॥ क्लेशहानिः कथं भूयाज्जीवानां व्रतदानतः ॥ ३ ॥ सूत उवाच ॥ शृणुध्वमृषयः सर्वे रहस्यं परमाद्भुतम् ॥ पुरा क्रौञ्चाद्रिशिखरे अगस्त्यो भगवानृषिः ॥ ४ ॥

मनुष्यलोकीं दुःख-शोक-भयदायक घोर कलियुग प्राप्त झालें असतां जीवांच्या क्लेशांचा नाश कोणत्या व्रतानें किंवा दानानें कसा होईल? ३. ते समयीं सूत सांगतो. सर्व ऋषीहो, परम आश्चर्यकारक रहस्य श्रवण करा. तें असें कीं, पूर्वीं क्रौंच पर्वताच्या शिखरावर योगैश्वर्यवान् अगस्त्यऋषि४

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कार्तिकस्वामीजवळ येऊन त्यास नमस्कार करून हें पुढील भाषण बोलला. अगस्त्य प्रश्न करतो हे सर्वविद्याभिज्ञा, हे ज्ञानसंपन्ना, कृत्तिकानंदना, हे स्कन्दा माझ्या दुःखाची शांति निश्चयें-करून कोणत्या उपायानें होईल? ५. कारण, मीं वाराणसी सोडली. कल्याण-कारक भागीरथी सोडली. देवकार्यासाठीं देदीप्यमान विश्वनाथाचा त्याग केला. ६. आणि मी दंडकारण्यांत आलों. तेणें करून अत्यं-

स्कन्दं प्राप्य नमस्कृत्वा वचनं चेदमब्रवीत् ॥ अगस्त्य उवाच ॥ कार्तिकेय महाप्राज्ञ सर्ववि-
द्याविशारद ॥ केनोपायेन भोः स्कन्द दुःखशान्तिर्भवेद्ध्रुवम् ५ ॥ वाराणसी मया त्यक्ता त्यक्ता
भागीरथी शुभा ॥ विसृज्य विश्वनाथं च देवकार्यार्थमुज्ज्वलम् ॥ ६ ॥ दण्डकानागतश्चाहं
ततश्चिन्तातुरो भृशम् ॥ कुत्र विश्वेश्वरो देवः कुत्राहं चागतो मुनिः ॥ ७ ॥ इति चिन्तान्वितमना
न लभे शर्ममद्भुतम् ॥ भवद्दर्शनमात्रेण किंचिन्न्यूनं ममाद्य वै ॥ ८ ॥

त चिंतातुर झालों आहें. कारण विश्वेश्वरदेव कोठें व मी मुनि कोठें आलों. ७. अशा चिंताक्रांत मनामुळें मला सुख होत नाहीं हें अद्भुत झालें आहे. आज तुमच्या दर्शनमात्रेंकरून माझें किंचित् मनोदुःख कमी झालें आहे. ८. ॥७॥ ॥७॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

यास्तव हे विशालनेत्र दयानिधे षडानना, मला दुःखशांतीचा उपाय सांगा. त्याकाळीं स्कंद सांगतात.हे ऋषिश्रेष्ठा, तुला विश्वे
श्वराचें दर्शन प्रिय असल्यामुळें तूं धन्य आहेस. आणि अविनाशी श्री शंकराविषयीं तुझी अशी भक्ति आहे हें बहुत
उत्तम आहे. ९. यास्तव हे समर्थ मुने, तुझ्या व सर्व लोकांच्या हितार्थ सांगतों; कारण हे ब्राह्मणश्रेष्ठा, साधूंस न सांग

अतो ब्रूहि विशालाक्ष प्रभोः षण्मुख दयानिधे ॥ स्कन्द उवाच ॥ साधु साधु ऋषिश्रेष्ठ विश्वेश
प्रियदर्शन ॥ धन्यस्त्वमीदृशी भक्तिस्तव श्रीशंकरेऽव्यये ॥ ९ ॥ अतो वच्मि हितार्थाय सर्वेषां
तव च प्रभो ॥ नावाच्यं विद्यते ब्रह्मन् साधूनां गुह्यमप्युत ॥ १० ॥ शृणुष्वैकाग्रमनसा दुःखशा-
न्तिकरं परम् ॥ शिवप्राप्तिकरं पुण्यमष्टैश्वर्यप्रदायकम् ॥ ११ ॥ व्रतं श्रीदेवदेवस्य शिवस्य पर-
मात्मनः ॥ सर्वसंकष्टरोगघ्नं नाम्ना वरदशंकरम् ॥ १२

ण्यासारखें असें गुह्य किमपि नाहीं. १०. तस्मात् असंत
दुःखशांति करणारें आणि शिवाची प्राप्ति करून देणारें पुण्यदायक व अणिमादिक आठ प्रकारचें योगैश्वर्यदायक असें व्रतश्र
वण कर. ११. कारण श्रीदेवाधिदेव परमात्मस्वरूप शिवाचें हें व्रत सर्व संकटें व रोग यांस हरण करणारें असून वरदशंकर या

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नामानें प्रसिद्ध आहे. १२. हे ब्रह्मर्षे, जें व्रत केल्यानें दुःखाची शांति निश्चयें करून होते. हें व्रत पूर्वकल्पीं शिवानें रजोरूपी ब्रह्मदे
वास कथन केलें. १३. अगस्त्यमुनि विचारितो-हे कार्तिकस्वामिन्, शिवानें वरदशंकरव्रत कोणतेकाळीं सांगितलें? तें सांगा.
आणि कृपा करून या व्रतराजाचा विस्तारही सांगा. १४. तेव्हां स्कंद सांगतात. हे कुंभोत्पन्न महामुने, एकाग्रचित्त होऊन श्रवण

कृतेन येन विप्रर्षे दुःखशान्तिर्भवेद्ध्रुवम् ॥ शिवेनोक्तं पुरा कल्पे ब्रह्मणे रजरूपिणे ॥ १३ ॥ अग-
स्त्य उवाच ॥ कदा शिवेन कथितं व्रतं व्ररदशंकरं ॥ तद्ब्रूहि कृपया स्कन्द व्रतराजस्य विस्तरम् १४
स्कन्द उवाच ॥ शृणुष्वावहितो भूत्वा कुम्भोद्भव महामुने ॥ रहस्यं देवदेवस्य सर्वपापप्रणाशन-
म् ॥ १५ ॥ पुरा कल्पांतसमये मायाशक्तिभिरीश्वरः ॥ संहृत्य च जगत्कृत्स्नं स्थावरं जङ्गमं
तथा १६ ॥ रमते कालशक्त्या च आत्मारामोपि शंकरः ॥ एकार्णवे तदा तस्य सृष्टि बुद्धिः प्रवर्तिता १७

कर. हें देवाधिदेवाचें रहस्य सर्व पापांचें नाशक आहे. १५. तें असें कीं, पूर्वी कल्पांतसमयीं ईश्वर आपल्या मायाशक्तीनीं स्थावर
(अचर) तसेंच जंगम (चर) अशा सर्व जगाचा संहार करून १६ शंकर आत्मस्वरूपीं रममाण असून कालशक्तीसहवर्तमान रमता-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

व॰ शं॰ ण झाला. नंतर त्या प्रलयसमुद्रांत शंकरास सृष्टिबुद्धि उत्पन्न झाली. १७. त्या कालीं अहंकारशक्ति उत्पन्न होतांच तिच्या ठिकाणीं अ॰ क॰ प्रा॰
३ सात्विक विष्णु होऊन तो वैकुंठभूषण शेषशय्येवर आरूढ होऊन शयन करिता झाला. १८. त्याच्या नाभींतून कमळ उत्प अ॰ १
न्न झालें. त्यापासून ब्रह्मदेव झाला. तो सर्व पृथ्वी जलानें व्याप्त झालेली पाहून त्या योगानें अत्यंत चिंताक्रांत झाला. १९

अहं शक्तिस्तदोत्पन्ना तस्यां विष्णुश्च सात्विकः॥ स शेषशय्यामाधाय शेते वैकुण्ठभूषणः॥
१८॥ तस्य नाभेरभूत्पद्मं तस्माज्जातः पितामहः॥ स वीक्ष्य सजलां पृथ्वीं ततश्चिंतातुरो भृ-
शम् ॥१९॥ कस्मादहं समुत्पन्नः किं कर्तव्यं मयाऽधुना ॥ इतस्ततो जलैः पूर्णं दृश्यते सचराचर-
म् ॥२०॥ इति चिन्तान्वितो वेधाः किंचिच्चित्रमभूत्तदा॥ मधुकैटभौ दैत्यौ च विष्णोः कर्णम-
लात्तदा ॥२१॥ जातौ सद्यस्तु तौ दृष्ट्वा ब्रह्माणं कनकप्रभम् ॥

तो असा कीं, मी कोणापासून उत्पन्न झालों.
या कालीं मीं काय करावें? सर्व चराचरसहित जग उदकानें पूर्ण झालें आहे. २०. अशा चिंताक्रांत ब्रह्मदेवास त्या कालीं कांहीं आ ३
श्चर्य दृष्टिगोचर झालें. तें असें कीं, त्या कालीं विष्णूच्या कर्णमलापासून दैत्यश्रेष्ठ मधुकैटभ २१ हे उत्पन्न झाले. तत्काल सुवर्ण

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कांतियुक्त ब्रह्मदेवास पाहून ते उभयतां दैत्य तेथें ब्रह्मदेवास मारण्याच्या बुद्धीनें त्यास दृढ मुष्टींनीं प्रहार करूं लागले. २२ ते समयीं ब्रह्मदेव त्या मुष्टिप्रहारांनीं बहुकाल ताप पावून हें पुढील वाक्य बोलला. तें असें कीं, ब्रह्मदेव म्हणतो हे शंकरा, शरण आलेल्या दीन पीडित जनांच्या रक्षणाविषयीं तूं उत्तम आश्रय आहेस. व तूं सर्वांची पीडा हरण करणारा आहेस यास्तव या दै

हन्तुं कृतधियौ तत्र जघ्नतुर्दृढमुष्टिभिः॥२२॥ तदा ब्रह्मा चिरं तप्तो वाक्यमेतदुवाच ह॥ ब्रह्मोवाच॥ शरणागतदीनार्त-परित्राणपरायण॥ सर्वार्तिहर शंभो त्वं त्राहि मां दैत्यसंकटात्॥२३॥ मां खादयितुमिच्छन्ता- वेतौ दैत्यौ सुदुर्मदौ॥ कमहं शरणं यामि त्वदन्यं जगतां प्रभो॥२४॥ त्वं त्राता त्रिषु लोकेषु त्वं हर्ता निखिलार्तिहृत्॥ विष्णुप्रबोधनेनाद्य मम दुःखं व्यपोहय॥२५॥ इ-ति स्तुतस्तदा शंभुर्वियद्वाचाब्रवीद्वचः॥

त्यसंकटापासून माझें रक्षण कर. २३. हे जगत्प्रभो, हे अत्यंत दुष्ट मदोन्मत्त दैत्य मला भक्षण करण्याविषयीं इच्छितात. यास्तव मी तुझ्यांवांचून अन्य कोणास शरण जाऊं? २४ कारण त्रैलोक्यांत तूं त्राता असून सर्वांच्या पीडेचा नाश करणारा व सर्व संहर्ता आहेस. यास्तव या कालीं विष्णूला जागृत करून माझें दुःख दूर कर. २५. असा ब्रह्मदेवानें स्तवि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

 लेला शिव त्या कालीं आकाशवाणीनें भाषण करितो कीं, हे ब्रह्मदेवा, या कालीं हें उत्कृष्ट शांतिकारक वचन ऐक. २६ तें असें कीं, तूं
वरदशंकर या देवाची पूजा विधीनें कर. तेणें करून तुझी दुःखांतून मुक्तता होईल यांत संशय नाहीं. २७. असें आकाशवाणीपा-
सून आपलें हित श्रवण करून त्या कालीं ब्रह्मदेव सजल हस्तानें नेथें संकल्प करिता झाला कीं, मी तें अद्भुत व्रत करीन. २८ परंतु-

भो विरिञ्चे शृणुष्वाद्य दुःखशांतिकरं परम् ॥२६॥ वरदं शंकरं देवं पूजयस्व विधानतः॥ तेन ते
व्यसनान्मुक्तिर्भविष्यति न संशयः ॥२७॥ स्वकं हितं तदा श्रुत्वा विधिः सजलपाणिना ॥ संकल्पम-
करोत्तत्र करिष्ये व्रतमद्भुतम् ॥२८॥ यदा दुःखस्य मे हानिर्भविष्यति सुदारुणा ॥ पूजयिष्ये वि-
धानेन तदा वरदशंकरम् ॥२९॥ इति संकल्पमात्रेण शिवस्य च प्रसादतः॥ योगनिद्रा हरेः काया-
न्निर्गता बहुरूपिणी ॥३०॥ उदतिष्ठज्जगन्नाथस्तया मुक्तो जनार्दनः॥

ज्या कालीं माझ्या दुःखाचा समूल
नाश होईल, त्या कालीं मी विधानानें वरदशंकराची पूजा करीन. २९ असा संकल्प करतांच शिवाच्या प्रसादेंकरून हरीच्या अंगापासून बहु-
रूपें धारण करणारी योगनिद्रा निघाली. ३०. तेव्हां तिणें सोडलेला जगाचा नाथ जनार्दन उठला, आणि उभयतां दैत्यांनीं ब्रह्मदेव

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बहुन पीडित केला आहे त्यामुळें तो अत्यंत क्लेशाक्रांत झाला आहे असें पाहून ३१ अत्यंत कृपेनें व्याप्त होऊन तो त्या दैत्यांशीं युद्ध करण्यासाठीं स्वतः धांवला. तेव्हां ब्रह्मदेवास सोडून ते वीर हर्षानें विष्णूशीं संग्राम करूं लागले. ३२ तेव्हां ते दोघे दैत्य बाहु-युद्धाविषयीं कुशल असून हरीशीं परस्परें क्रुद्ध झाले असतां भगवान् हरी त्या प्रलयसमुद्रांत त्या दैत्यांशीं युद्ध करूं लागला

क्लेशाक्रान्तं विधिं दृष्ट्वा दैत्याभ्यां पीडितं बहु ॥३१॥ कृपया परयाविष्टो योद्धुमभ्यद्रवत्स्वयम् ॥ त्यक्त्वा विरञ्चिं तौ वीरौ प्रधनं चक्रतुर्मुदा ॥३२॥ अन्योन्यं तौ रुसंरब्धौ बाहुयुद्धविशारदौ एकार्णवे तदा ताभ्यां युयुधे भगवान् हरिः॥३३॥ पञ्च वर्ष सहस्राणि युद्धं कृत्वा सुदारुण-म् ॥मुष्टिघातैःकूर्परैश्च श्लथदङ्गस्तदाभवत् ॥३४॥स त्यक्त्वा प्रधनं सर्वं पलायनपरोऽभव-त्॥ दैत्यावूचतुः ॥क्व गच्छसि महाविष्णो त्यक्त्वा संग्राममद्य नः॥क्षणं तिष्ठ क्षणं तिष्ठ स्व-वीर्यं च प्रदर्शय॥३५॥

३३. असें पांच हजार वर्षें अतिभयंकर युद्ध करून मुष्टिप्रहार व कोंपरांचे आघात यांनीं त्या कालीं विष्णु शिथिलांग झाला.३४. नंतर तो हरी सर्व युद्ध सोडून पलायन करण्याविषयीं उद्युक्त झाला.ते समयीं दैत्य म्ह-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

व.शं. णतात हे महाविष्णो, आज आमचा संग्राम सोडून कोठें जातोस? क्षणमात्र उभा रहा, क्षणमात्र उभा रहा. आणि आपला पराक्रमदा क्र.कृ.श्रा.

५ खीव. ३५ असें बोलून ते दैत्य हंसले. तों इतक्यांत विष्णु त्या प्रलयसमुद्रोदकांत लीन झाला; तेव्हां ते दोघे दैत्य त्यास शोध- अ.१

ण्यासाठीं त्या प्रलयोदकसमुद्रांत फिरूं लागले. ३६. असा तो विष्णु शंभर वर्षे पर्यंत त्या प्रलयोदकामध्यें गुप्त होऊन राहि-

इत्युक्त्वा तौ जहसतुस्तावद्विष्णुर्जलाशये ॥ लीनो बभूव दैत्यौ तौ भ्रेमतुश्च जलार्णवे ॥३६॥
वर्षाणां च शतं विष्णुर्जलमध्ये निरोदधे ॥ तुष्टाव शंभुं दिव्याभिर्वाग्भिर्भयनिवृत्तये ॥३७॥
विष्णुरुवाच ॥ नमो निर्गुणं शंकरं लोकवन्द्यं नमः पालकं तारकं भक्तपालम् ॥ नमः कालसर्प-
ग्रसत्राणहेतुं स्थितिं सृष्टिनाशौ गुणैरादधानम् ॥३८॥

ला. आणि त्या दैत्यभयनिवृत्त्यर्थ दिव्य वाणी-
नीं शंकराची स्तुति करूं लागला. ३७. ती अशी कीं, विष्णु ह्मणतो सर्व लोकांनीं नमस्कार व स्तुति करण्यास योग्य अशा
निर्गुण शंकरास मी नमस्कार करितों. आणि जो रक्षण करणारा असून भवसागरांत तारक व भक्तांचें पालनही करणा- ५
रा आहे यास्तव मी त्यास नमस्कार करितों. त्याच प्रमाणें कालसर्पाच्या ग्रासापासून रक्षण होण्यास कारण असून जगाचें सृ

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ष्टि स्थिति प्रलय हें सत्वादि त्रिगुणांनीं करणारा अशा शंकरास मी नमस्कार करितों. ३८. हे मायाधीशा, सकल तत्वांच्या आधार रूपा, श्रुतीचें तत्व जाणणाऱ्या व श्रुतीपासून उत्पन्न झालेल्या बोधांनीं जाणण्यास योग्य अशा कैलासगिरीवर निद्रा करणाऱ्या शिवा, तुला नमस्कार असो. अतिशय समीपवर्ती जे तुझी त्यांस नमस्कार. तुझां सर्व स्वरूपास नमस्कार. तुझां सर्वांसि नमस्कार

नमो मायाधीशो सकलजगदाधार गिरिश श्रुतीनां तत्वज्ञ श्रुतिजनितबोधैरवगम॥ नमो
नेदिष्ठाय त्वम सकलरूपाय च नमो नमः सर्वस्मै ते हर भुवनरूपाय च नमः॥३९॥ इति
स्तुतस्तदा शंभुराविरासीज्जगत्प्रभुः॥ तं दृष्ट्वा देवदेवेशं बहुरूपधरं प्रभुम्॥ ४०॥ ननाम
शिरसा विष्णुस्तुष्टाव जगदीश्वरम्॥ नमस्ते देवदेवेश करुणारसवारिधे॥ ४१॥ ७॥

हे मदनाच्या नाशका, भुवनरूप अशा तुझांकारणें नमस्कार असो. ३९. या प्रकारें स्तविलेला जगाचा प्रभु शंभु त्या काळीं प्रकट झाला. त्या बहुरूपें धारण करणाऱ्या देवादिदेव प्रभु शिवास अवलोकन करून ४०. विष्णु त्या जगदीश्वरास मस्तकानें नमस्कार करून स्तुति करूं लागला; ती अशी कीं, हे देवाधिदेवा, करुणारससमुद्रा, तुला नमस्कार असो. ४१ ॥७॥ ७॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हे अनाथनाथा, सर्वज्ञा, धूर्जटे, नीललोहिता, हे शंभो, तूं दीनबंधु आहेस. तर दैत्यसंकटापासून माझें रक्षण कर. ४२. मधु कैटभ दैत्य माझ्या कर्णमलापासूनउत्पन्न झाले असून मला मारण्यासाठीं प्राप्त झाले आहेत या दुर्जय शत्रूंस मार. हे त्रिपुरारे तुला नमस्कार असो. ४३. स्कन्द ह्मणतो हे अगस्त्यमुने, असें विष्णूचें स्तुतिवाक्य श्रवण करून शिव प्रसन्न होऊ

अनाथनाथ सर्वज्ञ धूर्जटे नीललोहित ॥ हे शंभो दीनबंधुस्त्वं त्राहि मां दैत्यसंकटात् ॥ ४२॥
मत्कर्णमलसंभूतो मां हन्तुं समुपस्थितो ॥ जहि शत्रून्दुराधर्षौ त्रिपुरारे नमोस्तु ते ४३
स्कन्दउवाच ॥ इति वाक्यं समाकर्ण्य शिवस्तुष्टोब्रवीद्वचः॥ शिव उवाच ॥ विना दैवेन
भोः शार्ङ्गिन्नुद्यमो हि निरर्थकः॥ ४४॥ केवलं बलमाश्रित्य यतन्ते स्वार्थसाधकाः॥ ते-
षां दुःखं भवेद्भूरि तत्त्वया भुक्तमेव च ॥ ४५॥

न भाषण करितो. तें असें कीं, शिव ह्मणतो हे शार्ङ्गधनुष्यधारिन्, दैवांवांचून केवळ उद्योग व्यर्थ आहे. ४४. केवळ बला चा आश्रय करून जे स्वार्थसाधक यत्न करितात त्यानां दुःख बहुत होतें तें तूं भोगलेंच आहेस. ॥ ४५॥ ॥श्रीराम्॥ ७॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तस्मात् दैवच अर्थसिद्धी विषयीं श्रेष्ठ कारण आहे असें तत्त्वज्ञ बोलतात. पूर्वसंचित जें पुण्य तेणें करूनच संसारांत सुखानें स्थि
ति होते. केवल अन्यप्रयत्नानीं होत नाहीं. ४६. यास्तव हे कमलाकांता, तूं वरदशंकराचें व्रत कर. म्हणजे तेणेंकरून तुझें
कल्याण होईल. यांत संशय नाहीं. ४७ त्या कालीं विष्णु प्रश्न करितो हे महादेवा, वरदशंकरव्रत कसें व तें मीं या कालीं क-

देवमेव परं प्राहुर्यत्पुण्यं संचितं पुरा ॥ तेनैव सुखसंवासो भविष्यति न चान्यथा ॥ ४६॥ अतस्त्वं
कमलाकान्त व्रतं वरदशंकरम् ॥ कुरुष्व तेन ते स्वस्ति भविष्यति न संशयः ॥ ४७ ॥ ॥ विष्णुरु-
वाच ॥ ॥ कीदृग्व्रतं महादेव कथं कार्यं मयाधुना ॥ तद्वदस्व विधानेन परं कौतूहलं हि मे ॥ ४८
शिव उवाच ॥ सदा कार्यं सदा कार्यं व्रतमेतत्सुखावहं ॥ अनर्घ्यैर्वैभवैर्युक्तं मण्डपं कारयेद्गृहे ॥
४९

सें करावें ? तें मला विधानानें सांगा. मला त्याविषयीं परम आश्चर्य वाटत आहे. ४८ ते समयीं शिव सांगतात. हे विष्णो, हें वरदशंकरव्र
त सदा करावें. सर्वकालीं करावें, कारण हें सर्वांस सुखकारक आहे. याचा विधि असा कीं. घरांत अमोलिक संपत्तीनीं मंडप करावा ४९

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आणि त्यावर पंचरत्नयुक्त कुंभ स्थापन करावा. त्या कुंभावर सुवर्ण, रौप्य, अथवा ताम्र या धातूंतील कोणत्या तरी धातूची स्व
शक्त्यनुसार वरदशंकराची प्रतिमा करून स्थापन करावी. ५० आणि धातुप्रतिमेचा अभाव असला तर प्रतिमास्थानीं सुपारी
मांडावी. किंवा तशीच वालुकामय मूर्ति स्थापन करावी. ती श्रीशंभुमूर्ति सुप्रसन्नमुख असून तशाच आकृतियुक्त पार्वतीनें सु

तत्र कुम्भंच संस्थाप्य पञ्चरत्नसमन्वितम् ॥ सौवर्णं राजतं ताम्रं कृत्वा वरदशंकरम् ॥ ५० ॥
तेषामभावे क्रमुकैर्यद्वा वालुमयं तथा ॥ सुप्रसन्नमुखं शंभुं श्रीदेव्या शोभितं तथा ॥ ५१ ॥
संपूज्य विधिवद्भक्त्या नाना विभवविस्तरैः ॥ नैवेद्यं कारयेत्तत्र गोधूमस्य च चूर्णकैः ॥ ५२
शर्करा घृतसंयुक्तं त्रिपात्कार्यं विचक्षणैः ॥ एकभागं शंकराय द्वितीयं तु द्विजातये ॥ ५३ ॥
तृतीयं चैव सर्वेषां प्रसादं प्रददेद्व्रती ॥

शोभित असावी. ५१ अशा त्या वरदशंकराची पूजा भक्तीनें उत्तम
प्रकारें अनेक विस्तरयुक्त वैभवानें विधियुक्त करून त्या व्रतांत गोधूमांच्या (गव्हांच्या) चूर्णानें नैवेद्य करावा. ५२ तो शर्करा व घृ
त यांनीं युक्त असून ज्ञात्यांनीं तीन भाग युक्त करावा. त्यांतील एक भाग शंकरास. दुसरा भाग ब्राह्मणांस. ५३ व तिसरा भाग

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

व्रत करणारानें सर्व आलेल्या इतर जनांस द्यावा. आणि व्रतकर्त्यानें एकाग्रचित्तेंकरून कथाश्रवण करून नंतर ब्राह्मणांस भोजन घालावें. ५४. असा तो वरदशंकराचा प्रसाद ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चारी वर्णांनीं घ्यावा. व्रतकर्त्यानें बंधु व स्वकीय मित्रादि गण यांसह तो नैवेद्य भक्षण करावा. ५५. या व्रतांतील प्रसादाच्या भक्षणाविषयीं चंडाचा दोष नाहीं. हे महाभाग्यशा-

कथां श्रुत्वैकचित्तेन ब्राह्मणान्भोजयेत्ततः ५४ ब्रह्मक्षत्रविशः शूद्रा गृह्णीयुस्तं प्रसादकम् ॥
स्वयं भुञ्जीत नैवेद्यं बन्धुभिः स्वगणैःसह ॥ ५५ ॥ नात्र चण्डस्य वै दोषः प्रसादस्य च भक्षणे
इति कृत्वा महाभाग ततः पूर्णमनोरथः ॥ ५६ ॥ भविष्यति दुःखहानिर्नात्र कार्या विचारणा ॥ श्री
विष्णुरुवाच ॥ ॥ भवन्मुखाच्छ्रुतं सर्वं तत्करिष्याम्यसंशयम् ॥ ५७ ॥ मही जलार्णवे मग्ना नास्ति
गोधूमचूर्णकम् ॥ अस्मिन्काले कथं देव चरितव्यं व्रतं मया ॥ ५८ ॥

लिन्. असें हें व्रत करून त्या योगानें मनोरथ पूर्ण होऊन ५६. दुःखाचा नाश होतो. याविषयीं विचार करूं नये. तेसमयीं विष्णु पुनः प्रश्न करितो. हे शंकरा, तुमच्या मुखांतून हें सर्व श्रवण केलें. तें व्रत मी आतां निश्चयेंकरून करतों. ५७ परंतु पृथ्वी प्रलयसमुद्रांत बुडाली आहे यामुळें गोधूमचूर्ण नाहीं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

यास्तव हे देवा, या काळीं मीं हें व्रत कसें करावें! ५८ तेव्हां श्रीशिव ह्मणतात ज्या काळीं जें द्रव्य असेल त्यानेंच पूजन करणेंसं मत आहे. तस्मात् या काळीं उदकानेंच पूजन कर. हें युक्तच आहे. ५९. कारण तो जगाचा नाथ हर जलानें पूजित केला तरी-तो क्लेशांचा नाश करितो. आणि तोच भक्तीच्या योगानें वर देणारा शंकर इच्छित मनोरथ पूर्ण करितो. ६०. स्कंद ह्मणतो हे

श्रीशिव उवाच॥ ॥यदा यज्जायते द्रव्यं तेनैव पूजनं मतम् ॥ अस्मिन्काले जलेनैव पूजनं कुरु सांप्रतम् ॥ ५९ ॥ जलेनापि जगन्नाथः पूजितः क्लेशहा हरः ॥ ददाति वाञ्छितान् कामान् भक्त्या वरदशंकरः ॥६०॥ स्कंद उवाच ॥ इत्युक्त्वान्तर्दधे देवो बहुरूपी सदाशिवः ॥अंतर्हिते भगवति नमस्कृत्य महेश्वरम् ॥ ६१ ॥ व्रतं चकार विधिवज्जलोपस्कर वैभवैः ॥ कथाकाले तु संप्राप्ते चिन्तायुक्तोऽभवद्धरिः ॥ ६२ ॥

महामुने, असें भाषण करून तो बहुरूपी सदाशिव देव गुप्त झाला. असा तो भगवान् अंतर्धान पावला असतां त्या महेश्वरास नमस्कार करून ६१. विष्णु जलरूपसाहित्योपचारवैभवांनीं विधियुक्त व्रत करिता झाला. पुढें कथाश्रवणाचा काल प्राप्त

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

झाला असतां हरी चिंताक्रांत झाला. ६२. तो असा कीं, या व्रतांत वरदशंकराची कथा कोणीं सांगावी? अशी चिंता विष्णु करीत आहे तों तत्काल नाभीकमलाच्या देठांतून सुवर्णसमान कांतीनें तेजःपुंज असा ब्रह्मदेव निघाला. ६३ तेव्हां त्याच्या चार मुखां तून कथा सांगण्यासाठीं चार वेद निघाले. ते समयीं शिवाच्या प्रसादें करून त्या वेदांच्या योगानें कथाश्रवण करून विष्णूनें

केन कार्या कथा चात्र वरदा शंकरस्य च ॥ तदा नालाद्बहिर्यातो विरञ्चिः कनकप्रभः ॥ ६३ ॥
कथार्थं तस्य वक्त्रेभ्यश्चतुर्वेदाश्च जज्ञिरे ॥ शिवप्रसादात्तैर्वेदैः कथां श्रुत्वा हरिः स्वयम् ६४ ॥
प्रसादं ब्रह्मणे दत्वा स्वयमादद्धरिस्तदा ॥ तुष्टाव वरदं देवं शंकरं लोकशंकरं ॥ ६५ ॥ वरदःशं-
करस्तत्र आविर्भूत्वा वचोब्रवीत् ॥ श्रीवरदशंकर उवाच ॥ प्रसन्नोस्मि वरं ब्रूहि विष्णो
त्वद्व्रतयोगतः ॥ ६६ ॥

६४ ॥ : तो प्रसाद ब्रह्मदेवास देऊन नंतर स्वतः भक्षण केला. आणि लोककल्याण करणाऱ्या वरप्रद शंकरदेवाची स्तुति केली. ६५ त्याकालीं वरदशंकर तेथें प्रकट होऊन भाषण करितात. तें असें कीं, हे विष्णो, तूं व्रत केल्यानें मी प्रसन्न झालों. वर माग-

६६

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

माझी पूजा केल्यावर पुनः दुःख भोगण्यास पुरुष योग्य नाहीं. आणि मी देतों हें चक्रश्रेष्ठ सुदर्शन उत्तम प्रकारें ग्रहण कर. ६७
व या चक्रानें जगास पीडा करणाऱ्या त्या सर्व दैत्यांचा वध कर. त्याचप्रमाणें माझ्या व्रताच्या सामर्थ्यें करून तूं जगांत पूज्य
होशील. ६८. तसाच तूं भक्ति व मुक्ति हीं देणारा जगत्त्रयांत होशील; देव, दैत्य यांसहित गंधर्व व यक्षनाग यांसहित राक्षस

पूजयित्वा नरो मां वै न पुनर्दुःखभाग्भवेत् ॥ मया दत्तं संगृहाण चक्रराजं सुदर्शनम् ॥ ६७
अनेन जहि दैत्यांस्तान् जगत्पीडाकरान्बहून् ॥ मद्व्रतस्य प्रभावेन जगत्पूज्यो भविष्यसि ॥ ६८
भुक्तिमुक्तिप्रदस्त्वं हि भविष्यसि जगत्त्रये ॥ ससुरासुरगन्धर्वाः सयक्षोरगराक्षसाः ॥ ६९
नित्यं त्वामर्चयिष्यन्ति नान्यथा मद्वचो भवेत् ॥ करोतु ब्रह्मा सृष्टिं च त्वं स्थितिं मत्प्रसादतः ७०
मत्तेजस्त्वयि चाधास्ये मद्रूपस्त्वं भविष्यसि ॥ इति दत्वा वरान्सर्वान् वैकुण्ठं च ददौ स्वयम् ७१

हे ६९ तुझी सर्वदा पूजा करतील. हें माझें भाषण व्यर्थ होणार नाहीं. माझ्या प्रसादानें ब्रह्मदेव सृष्टि करो. व तूं पालन कर. ७० मी
आपलें तेज तुझ्या अंगीं स्थापन करितों. तेणेंकरून तूं मद्रूप होशील. असें सर्व वर देऊन स्वतः वैकुंठही विष्णूस दिलें. ७१ ॥ ७ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आणि सर्व भूतें अवलोकन करीत असतां वरदशंकर आपलें स्वरूप गुप्त करून विष्णूच्या स्वरूपीं लीन झाला. तेणें करून त्या का
ळीं तो पुरुषश्रेष्ठ तेजःपुंज दिसूं लागला. ७२ आणि हातांत सुदर्शनचक्र धारण करून तो लक्ष्मीपति धन्य झाला. आणि त्या उदकां
तून त्वरित उठून त्या मधुकैटभदैत्यांस अवलोकन करून ७३ त्यांचीं मस्तकें सुदर्शनचक्रानें आपल्या कंबरेच्या पुढील भागावर

पश्यतां सर्वभूतानामन्तर्धाय स्वकं वपुः ॥ विष्णौ लीनस्तदा तेन जज्वाल पुरुषोत्तमः ॥७२॥
चक्रं सुदर्शनं धृत्वा धन्योऽभूत्कमलापतिः ॥ उत्थाय च जलात्तूर्णं दृष्ट्वा तौ मधुकैटभौ ॥७३
कृत्वा चक्रेण वै छिन्ने जघने शिरसी तयोः ॥ मेदसा मेदिनीं कृत्वा अस्थिभिः पर्वतांस्तथा ॥७४
सृष्टिकार्यं विधायेत्थं वैकुण्ठं च जगाम ह ॥ इति पूर्वं व्रतं कृत्वा ब्रह्मा विष्णुश्च वै सुरौ ॥७५
वरदस्य प्रसादेन महत्त्वं प्रापतुः सदा ॥ कृच्छ्रान्मुक्तावभवतां सुप्रसन्नात्सदाशिवात् ॥७६

तोडलीं. नंतर त्याच्या मेदानें पृथ्वी केली ह्मणून हिला मेदिनी ह्मणतात. तसेंच त्यांच्या अस्थींचे पर्वत केले. ७४ असें सृष्टीचें कार्य करू
न विष्णु वैकुंठास गेला. असें पूर्वी व्रत करून ब्रह्मा व विष्णु हे देव ७५ वरदशंकराच्या प्रसादानें सर्वदा महत्त्व पावले. आणि स

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दाशिव प्रसन्न झाल्यामुळें ते दोघे देव संकटांतून मुक्त झाले. ७६ यास्तव हे ब्रह्मर्षे, अगस्त्यमुने, तूं हें कल्याणकारक श्रेष्ठ व्रत क

 र· तेणें करून तुझी दुःखांतून मुक्तता होईल. व तुला नित्य विश्वेश्वराचें दर्शन होईल. ७७ ॥ आणि हें सृष्टीच्या आरंभीं झाले

लें पुण्यकारक आख्यान जो श्रवण करील अथवा करवील तो कोटिकुलांचा उद्धार करून दुःसंगापासून मुक्त होतो. ७८ इ

अतस्त्वं कुरु विप्रर्षे व्रतराजमिमं शुभम् ॥ तेन मुक्तिर्भवेद्दुःखात् नित्यं विश्वेशदर्शनं ॥७७॥
आद्याख्यानमिदं पुण्यं शृणुयाच्छ्रावयेच्च यः ॥ सकोटिकुलमुद्धृत्य दुःखसंगाद्विमुच्यते ७८
इति श्रीभविष्योत्तरपुराणे व्रतखण्डे कलौ वरदशंकरव्रतकथनं नाम प्रथमोध्यायः॥ १ ॥
अगस्त्य उवाच ॥ ॥ धन्योस्म्यनुगृहीतोस्मि कृतार्थोस्मि महामते ॥ श्रावितं मे त्वया स्कन्द व्रतं वरदशंकरं ॥१॥

ति श्रीभविष्योत्तरपुराणे व्रतखंडे वरदशंकरव्रतकथनं नाम प्रथमोध्यायः॥ १ ॥ ॥ अगस्त्यमुनि भाषण करितो. हे म

हामते स्कंदा, आपल्या अनुग्रहानें मी धन्य आहें व कृतार्थ आहें. आपण मला वरदशंकरनामक व्रत सांगितलेंत. ॥ १ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

या कालीं तुमच्या मुखकमलापासून माझी श्रवण करण्याविषयीं तृप्ति होत नाहीं. यास्तव जेणें करून माझी तृप्ति होईल असें शीघ्र तुम्ही कांहीं सांगावें. २ त्या कालीं स्कंद सांगतो. हे ब्राह्मणा, वरदशंकराचें कथानक सांगतों श्रवण कर. ज्यास संततीची इच्छा असेल त्यानें हें पुत्रदायक व्रत अवश्य करावें. ३ या विषयीं परमेष्ठी ब्रह्मदेवाचा इतिहास सांगतों. तो असा

शृण्वतस्त्वन्मुखांभोजात् नास्ति तृप्तिर्ममाद्य वै ॥ पुनश्च कथयाशु त्वं येन तृप्तिर्भवेन्मम ॥२॥ स्कन्द उवाच ॥ ॥शृणु विप्र प्रवक्ष्यामि वरदस्य कथानकम् ॥ प्रजाकामेन कर्तव्यं व्रतमेतत्सुतप्रदम् ॥३॥ अत्रेतिहासं वक्ष्यामि ब्रह्मणः परमेष्ठिनः ॥ पुरा ब्रह्मा प्रजासर्गे योजितः प्रभविष्णुना ॥४॥ तदा सृष्टिं चकारासौ परं स्वास्थ्यं न चागमत् ॥ विष्णुं स्तुत्वा बहुस्तोत्रैस्तदा विष्णुर्जगाद ह ॥५॥ व्रतं पुरा त्वया वत्स वरदशंकरस्य च ॥ संकल्पितं नैव चीर्णं तत् कुरुष्व महामते ॥६

कीं, पूर्वीं विष्णूनें ब्रह्मदेवास प्रजासृष्टीविषयीं योजिलें. ४ त्या कालीं ब्रह्मदेव सृष्टि करूं लागला. परंतु त्यास उत्तम स्वस्थता वाटेना तेव्हां त्यानें बहुत स्तोत्रांनीं विष्णूची स्तुति केली. त्या कालीं विष्णु भाषण करितो. ५ हे वत्सा, तूं पूर्वीं वरदशंकराचें व्रत संकल्पित

कृतं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

केलेंस परंतु तें केलेंच नाहींस. तर हे महामते, तें आतां तूं कर. ६ ज्याच्या प्रसादानें मी विष्णु हें देदीप्यमान ऐश्वर्य पावलों च तूंही दुःखांतून मुक्त झालास. ७ त्या प्रभु शंकरास सोडून सृष्टि स्थिर कशी होईल? असें भाषण ऐकतांच ब्रह्मदेवानें तें वरदशंकराचें व्रत केलें. ८. असें देवाधिदेवाचें व्रत विष्णूनें सांगितलेल्या विधीनें करतांच त्या कालीं भगवान् देव

यत्प्रसादादहं विष्णुरैश्वर्यं ह्येतदुज्ज्वलम् ॥ प्राप्तवानस्मि त्वमपि येन दुःखाद्विमोचितः ॥ ७॥ तं त्यक्त्वा सर्वमीशानं कथं सृष्टिः स्थिरा भवेत् ॥ इति वाक्यं समाकर्ण्य चक्रे वै शांकरं व्रतं ॥ ८ ॥ विधिना देवदेवस्य कथितेन च विष्णुना ॥ तदा प्रसन्नो भगवान् देवो वरदशंकरः ॥ ९॥ उवाच वाक्यं ब्रह्माणं मधुरं मधुशान्तिकृत् ॥ ॥श्रीवरदशंकर उवाच ॥ ॥ वरं वरय भद्रं ते विरिञ्चे यच्च वाञ्छितम् ॥ १०॥

वरदशंकर प्रसन्न झाला. ९ आणि ब्रह्मदेवास मधासारखें सुखकारक मधुर वाक्य बोलला. तें असें कीं, श्रीवरदशंकर म्हणतात हे ब्रह्मदेवा, तुझें कल्याण असो. वर माग. जें तुझें इच्छित आहे तें पूर्ण होईल. १० ॥७॥ ॥७॥ ॥७॥ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ते समयीं ब्रह्मदेव ह्मणतो, मी प्रजावृद्धीची इच्छा करीत आहें. हे महाभुजा, ही इच्छा पूर्ण कर. आजपासून जे जीव तुझ्या-वरदशंकररूपास ११ भूलोकीं पूजित करतील, त्यांच्या कामना पूर्ण कर. तेव्हां वरदशंकर ह्मणतात माझ्या व्रताच्या सामर्थ्यानें तुझी सृष्टि स्थिर होईल. आणि आजपासून जे मानव माझें हें कल्याणकारक व्रत करतील १२ त्यांस संतति व धनवृद्धि हीं प्राप्त होतील. यांत अं-

ब्रह्मोवाच ॥ हे शंभोऽहं प्रजाकामस्त्वं साधय महाभुज॥ अद्य प्रभृति ये जीवास्त्वां वै वरदशंकरम् ॥ ११ ॥ भुवर्लोके ऽर्चयिष्यन्ति तेषां कामप्रदो भव॥ श्रीवरदशंकर उवाच ॥ मद्व्रतस्य प्रभावेन तव सृष्टिः स्थिरा भवेत् ॥ अद्यप्रभृति ये मर्त्याः कुर्वन्ति मद्व्रतं शुभम् १२ संततिर्धनवृद्धिश्च भवेत्तेषां न चान्यथा॥ वन्ध्या या विद्यते नारी तया कार्यमिदं व्रतम् ॥ १३ ॥ त्रिःसप्तकुलः पुत्रास्तु जायन्ते शुभलक्षणाः॥ स्रवद्गर्भा च या नारी काकवन्ध्या च या भवेत् ॥ ताभिः कृतेन येनैव भवेत्पुत्रस्तु शोभनः १४

तर होणार नाहीं. आणि जी स्त्री वंध्या आहे तिनें हें व्रत करावें. १३ ह्मणजे तिला शुभलक्षणयुक्त एकवीस पुत्र होतील. तसाच जिचा गर्भ स्रवत असेल आणि जी स्त्री काकवंध्या ह्मणजे एकच अपत्य प्रसवणारी असेल त्यांनीं हें व्रत के-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

लें तर त्यांस सुपुत्र होतील. १४ तसाच विद्येच्छु या व्रताच्या योगानें विद्या पावतो. द्रव्येच्छु या व्रतें करून धन पावेल. विजयेच्छु या व्रतें क
रून क्षत्रिय शत्रू पासून उत्तम जय पावतो. यांत संशय नाहीं. १५ हें व्रत मनुष्यास कलियुगांत विशेषें करून तत्काल सिद्धिकारक आ
हे. माझ्या व्रताच्या प्रभावें करून इच्छित कार्यें सिद्ध होतात. १६ कार्तिकस्वामी ह्मणतात असे उत्तम वर देऊन वरदशंकर देव हर सनका

विद्यार्थी प्राप्नुयाद्विद्यामर्थार्थी चार्थमाप्नुयात् ॥ विजयं क्षेत्रशत्रुभ्यः संप्राप्नोति न संशयः॥१५॥
विशेषतः कलियुगे सद्यः सिद्धिकरं नृणाम् ॥ सिध्यन्ति वाञ्छिता ह्यर्था मद्व्रतस्य प्रभावतः १६
स्कंद उवाच ॥ ॥इति दत्वा वरान्दिव्यान्देवो वरदशंकरः॥ पश्यतां सनकादीनां तत्रैवांतर्दधे हरः॥१७
पुनः शृणु कथामन्यां दैवीं वरदशांकरीम् ॥ पुरा विश्रवसः पुत्रः कुबेरो लोकविश्रुतः॥ १८॥ तपः
कृत्वा महद्दिव्यं तुष्टाव विधिमोजसा ॥ तुष्टः पितामहस्तस्मै लङ्काराज्यमदात्प्रभुः ॥१९॥

दिक अवलोकन क
रीत असतां अंतर्धान पावला. १७ हे अगस्त्यमुने, वरदशंकर देवाची दुसरी कथा पुनः श्रवण कर. ती अशी कीं, पूर्वीं विश्रव्याचा पुत्र कु
बेर या नामानें लोकांत प्रख्यात आहे. १८ त्यानें महत् दिव्य तप करून त्या तपोबलानें ब्रह्मदेवास संतुष्ट केलें. तेव्हां प्रभु ब्रह्मदे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

व प्रसन्न होऊन त्यांनीं कुबेरास लंकेचें राज्य दिलें. १९. आणि इच्छित स्थानीं जाणारें पुष्पक नामक दिव्य अद्भुत विमान दिलें. तेव्हां तो ब्रह्मदत्त ऐश्वर्यानें युक्त होऊन अत्यंत शोभला. २०. आणि तो सर्व लोकांच्या हिताविषयीं तत्पर असल्याकारणानें सर्वत्र परमानंद झाला. इतक्या संधींत दैत्य पृथ्वीतलांतून आले. २१ आणि त्या लंकाधीशा कुबेरास पाहून रावणास भाषण बोलूं लागले. तें असें

पुष्पकं कामगं दिव्यं विमानं वरमद्भुतम् ॥ स तेन शुशुभेऽत्यन्तमैश्वर्येण समन्वितः ॥ २० ॥ बभूव परमामोदः सर्वलोकहिते रतः ॥ एतस्मिन्नन्तरे दैत्याः प्रादुर्भूता रसातलात् ॥ २१ ॥ दृष्ट्वा लङ्कापतिं तं तु रावणं वाक्यमब्रुवन् ॥ दैत्या ऊचुः ॥ पश्य बन्धुममुं वीर सर्वलोकेषु विश्रुतम् ॥ वैश्रवणं तव सापत्नं महच्छ्रेयोर्जितं तथा ॥ २२ ॥ धिग्जीवितं कुलं चाद्य दैत्यानां बलशालिनाम् ॥ कदा द्रक्ष्यामहे वीर धनदं लोकगर्हितम् ॥ २३

कीं, दैत्य बोलले, विश्रव्याचा पुत्र असून तुझा सावत्र बंधु सर्व लोकांत प्रख्यात झाला आहे. अशा या बंधुरूपी कुबेरास पहा. तसाच तो कसा मोठ्या ऐश्वर्यानें उदयास आला आहे. २२ तस्मात् हे वीरा, आज बलशाली दैत्यांच्या जीवितास व कुलास ही धिक्कार असो. आम्ही कुबेरास लोकांनीं निंदित केलेला असा कधीं पाहूं. २३॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आणि तो दारिद्र्यानें युक्त व्हावा आणि तूं अतिशय संपत्तीनें उंच राजपदावर बसलेला असा आह्मी कधीं पाहूं. ते समयीं रावण ह्मणतो. तुह्मी विलंब न करितां माझें सत्य वचन श्रवण करा. हा माझाच बंधु असून मलाच सर्वदा मान्य आहे. २४ तरी मी आतां या पेक्षां अधिक संपत्ति व आधिपत्य हीं प्राप्त होण्यासाठीं साधन करितों. असें मातुलांस सांगून रावण तप करण्यासाठीं गे

दारिद्र्येण समायुक्तं त्वां चैवातिश्रियोच्छ्रितम् ॥ रावण उवाच ॥ यूयं मद्वचनं सत्यं शृणुध्व-
मविलंबतः ॥ एष बन्धुर्ममैव स्यात् मान्यश्चैव सदा मम ॥ २४ ॥ अस्मादप्यधिकां लक्ष्मीं साध-
याम्यधिपेड्यताम् ॥ मातुलानित्यमामन्त्र्य रावणस्तपसे ययौ ॥ २५ ॥ गोकर्णाख्ये महाक्षेत्रे
तपश्चक्रे सुदारुणम् ॥ यदा वै तपसः सिद्धिर्नाजायत महामुने ॥ २६ ॥ शिरश्छित्वार्पयामास
शंकराय महात्मने ॥ रक्षसस्तपसा तस्य तदा देवाश्च कम्पिरे ॥ २७ ॥

ला. २५ तो गोकर्णनामक महाक्षेत्रांत अत्यंत उग्र तप करूं लागला असतां जेव्हां तपाची सिद्धि होईना तेव्हां हे अगस्त्यमुने २६ रावण आपलें शिर तोडून महात्मस्वरूप शंकरास अर्पण करूं लागला. त्या काळीं रावणाच्या तपानें देव ताप पावून कंपायमान झाले. २७ ॥ ७॥ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

असा महाभुज रावण दहा हजार वर्षें असें तप करीत होता. तों इतक्या संधींत तेथें देवांचा ऋषि नारद आला. २८ ते समयीं त्या नारदमुनीस पाहून राक्षसराजा रावण त्यास नमस्कार करून भाषण करिता. रावण ह्मणतो, हे देवर्षे, आज मी धन्य झालों. कारण मी बहुकालानें तुह्मांस पाहिलें. समचित्त जे साधु त्यांचें दर्शन दुर्लभ आहे. २९ आज आपलें केवळ दर्शन झाल्यामुळें माझे-

दशवर्षसहस्राणि चक्रे इत्थं महाभुजः॥ एतस्मिन्नन्तरे तत्र देवर्षिर्नारदो ययौ॥ २८ ॥ तं दृष्ट्वा नारदं वीरः प्रणम्योवाच दैत्यराट्॥ रावण उवाच ॥ देवर्षे अद्य धन्योहं भवता वीक्षित श्चिरम्॥ साधूनां समचित्तानां दर्शनं दुर्लभं मतम्॥ २९॥ भवद्दर्शनमात्रेण गताः क्लेशा ममाद्य वै॥ प्राप्तुं त्रैलोक्य राज्यं मां यतमानं सदाशिवः॥ ३०॥ नायात्यद्यापि गिरिशः करुणापूर्णमानसः॥ किं करोमि क्व गच्छामि कथं श्रेयो भवेन्मम॥ ३१॥

क्लेश दूर झाले. त्रैलोक्यराज्य प्राप्त होण्यासाठीं मी यत्न करीत असून सदाशिव ३० हिमालयपर्वतावर निद्रा करणारा करुणापूर्णहृदय असा शंकर अद्यापि दर्शन देण्यास येत नाहीं तेव्हां आतां मी काय करूं? कोठें जाऊं? माझें कल्याण कसें होईल? ३१

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

यास्तव हे बुद्धिमंता, योगनिधे, त्वरित सिद्धिदायक उपाय सांगा· तेव्हां नारद ह्मणतात, हे राक्षसश्रेष्ठा, माझें सिद्धिदायक वाक्य
आज ऐक· तें असें कीं, तप व योगमार्ग यांनीं शिव बहुकालानें प्राप्त होतो. ३२ आणि वरदशंकरव्रतानें तर तो शीघ्र प्राप्त हो
तो· तस्मात् हे महाभाग्यशालिन् वरदशंकर व्रत कर· ३३ त्या व्रताच्या सामर्थ्यानें शंकर दर्शन देईल. असें नारदाचें वाक्य ऐ

वद योग निधे धीमन्नुपायं शीघ्रसिद्धिदम् ॥ नारद उवाच ॥ दैत्यवर्य शृणुष्वाद्य वचनं सिद्धि-
दं मम ॥ तपोभिर्योगमार्गैश्च स चिरात्प्राप्यते शिवः ॥ ३२ ॥ वरदस्य व्रतेनैव त्वचिरात्प्राप्तुमर्हति
तस्मात्कुरु महाभाग वरदं शांकरं व्रतं ॥ ३३ ॥ तद्व्रतस्य प्रभावेन दृश्यो भवति शंकरः ॥ इति वा-
क्यं समाकर्ण्य रावणो वाक्यमब्रवीत् ॥ ३४ ॥ व्रतं ब्रूहि विशालाक्ष शिवस्य परमात्मनः ॥ कृ-
तमात्रेण येनैव तुष्यत्याशु सदाशिवः ॥ ३५ ॥ नारद उवाच ॥ पुरा सदाशिवेनोक्तं ब्रह्मणे वि-
ष्णवे तथा ॥

कून रावण भाषण करितो. ३४ हे विशालनयना, परमात्मस्वरूप शिवाचें तें व्रत सांग. कारण केवळ तें
व्रत केल्यानें सदाशिव शीघ्र प्रसन्न होतोच. ३५. नारद ह्मणतात, पूर्वीं सदाशिवानें ब्रह्मदेव तसाच विष्णु यांस जें व्रत सांगितलें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तें व्रत तुला देतों; कारण तें त्वरित उत्तम सिद्धिकारक आहे. ३६. तें व्रतविधान असें कीं, ज्या स्थळीं व्रत कर्तव्य असेल तें स्थान शुद्ध शांत, निर्मल व सुशोभित असें करावें. त्यावर अष्टदल कमल काढून त्यास चार कोंपरे असावे. ३७ आणि तें पूजास्थान अनेक उत्सवांनीं युक्त करून केळीच्या खांबानीं सुशोभित करावें. आणि त्या कमलावर उदकानें पूर्ण भरलेला उत्तम कलश स्थापन करून त्यां

तद्व्रतं ते प्रदास्यामि शीघ्रं सिद्धिकरं परम् ॥ ३६ ॥ शुद्धं शान्तं निर्मलं च स्थानं कृत्वा सुशोभनम् ॥
पद्ममष्टदलं लेख्यं चतुष्कोण समन्वितम् ॥ ३७ ॥ नानोत्सवसमायुक्तं कदलीस्तंभमण्डितम् ॥
पद्मोपरि सुकलशं निधाय जलपूरितम् ॥ ३८ ॥ पञ्चपल्लवसंयुक्तं पञ्चरत्नसमन्वितम् ॥ दि-
क्ष्वष्टसु तथा पूज्या इन्द्राद्या दिगधीश्वराः ॥ ३९ ॥ उत्तरे सोमराजानं संपूज्य विधिवन्मुदा ॥ देवस्य
दक्षिणे भागे लक्ष्मीं विष्णुं च पूजयेत् ॥ ४० ॥

त पंचपल्लव व पंचरत्नें घालावीं. तसेंच कलशाच्या अष्टदिशांस इंद्रादिक आठ दिक्पाल पूजित करावे. ३९ उत्तरेस सोमराजाची उत्तम पूजा विधीप्रमाणें हर्षानें करावी. त्याच प्रमाणें देवाच्या दक्षिणभागीं लक्ष्मी व विष्णु यांचें पूजन करावें. ४० ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आणि मध्यभागीं श्रीमद्वरदशंकर लिंगाची पूजा करावी. व वामभागीं जगन्माता पार्वती उत्तम प्रकारें पूजावी. ४१ तसेंच देवाच्या अग्रभागीं पूगीफल ठेवून त्यावर नंदीचें आवाहन करावें. आणि पार्वतीच्या अग्रभागीं जयेची पूजा विधीनें करावी. ४२ अशा या देवतांचें पूजन प्रदोषकाळीं करावें. तें शिवाला संतोषदायक आहे. असें केलें असतां चतुर्दशभुवनांचें ऐश्वर्य प्राप्त होतें. ४३ आणि त्या

मध्ये संपूजयेल्लिङ्गं श्रीमद्वरदशंकरम् ॥ वामभागे तु संपूज्या भवानी जगदम्बिका ॥ ४१ ॥
नन्दिनं चाग्रतः कृत्वा पूगीफलसमन्वितम् ॥ जयां संपूज्य विधिवत् पार्वत्या वामभागतः ४२ ॥
एतत्संचदशं पूज्यं प्रदोषे शिवतुष्टिदम् ॥ प्राप्नुयात्सर्वमैश्वर्यं भुवनानां चतुर्दश ॥ ४३ ॥ नै-
वेद्यं तत्र त्रैपाद्यं गोधूमस्य च पिष्टकम् ॥ सशर्करं सघृतंच दद्याद्वै शंकराय च ॥ ४४ ॥
एकं भागं द्विजेन्द्राय जनानांतु द्वितीयकम् ॥ तृतीयं स्वयमद्यात्तु सपत्नीकः सबांधवः ॥ ४५ ॥

व्रतांत शर्करा व घृत यांसहित गोधूमांचें (गहूं) पीठ यांचा तीनभागयुक्त नैवेद्य शंकरास अर्पण करावा. ४४. त्यांतील एक भाग ब्राह्मणश्रेष्ठास द्यावा. दुसरा भाग इतर लोकांस देऊन तिसरा भाग स्त्रियांसहित बांधवांसह व्रतकर्त्यानें स्वतः भक्षण करावा. ॥ ४५ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वरदशंकराची कथा विधीनें श्रवण करून नंतर प्रसाद भक्षण करून ब्राह्मणांस भोजन घालावें. ४६ या व्रतराजानें शिव शीघ्र प्राप्त होतो. तें नारदवाक्य श्रवण करून त्या श्रेष्ठ मुनीस नमस्कार करून ४७ तो दैत्यश्रेष्ठ तें सर्व सिद्धिकारक व्रत करिता झाला. तेव्हां त्या व्रताच्या सामर्थ्यानें सदाशिव प्रसन्न झाला. ४८ आणि त्यानें अनेक प्रकारचे उत्तम वर देऊन मनुष्यावांचून अन्यापासून तुझा व

श्रुत्वा कथां विधानेन वरदशंकरस्य च ॥ पश्चाद्भुक्त्वा प्रसादं च ब्राह्मणांश्चैव भोजयेत् ॥ ४६ ॥
एतेन व्रतराजेन अचिरात्प्राप्यते शिवः ॥ तच्छ्रुत्वा नारदं वाक्यं नमस्कृत्य मुनीश्वरम् ॥ ४७ ॥
चक्रे व्रतं दैत्यवरः सर्वसिद्धिप्रदायकम् ॥ तद्व्रतस्य प्रभावेन प्रसन्नोऽभूत्सदाशिवः ॥ ४८ ॥ द-
त्वा नानावरान् दिव्यानवध्यत्वं नरं विना ॥ यक्षराक्षसदेवानामाधिपत्यं तथा ददौ ॥ ४९ ॥ द-
शवर्षसहस्रान्ते व्रताद्दिव्यान्मनोरथान् ॥ लब्ध्वा दैत्येश्वरस्तत्र जहर्षेऽत्यन्तमुज्ज्वलः ॥ ५० ॥

ध होणार नाहीं. असा वर दिला. तसेंच यक्ष राक्षस व देव यांचें आधिपत्य दिलें. ४९ या प्रमाणें दहा हजार वर्षांचे अंतीं त्या व्रताच्या योगानें दिव्य मनोरथ पावून तो दैत्यराज तेथें अत्यंत देदीप्यमान होऊन हर्ष पावता झाला. ॥ ५० ॥ ॥ ७ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आणि सर्व दैत्यांसहित केकशी नामक मातेपाशीं पुनः येऊन तिला मस्तकानें नमस्कार करून स्वतः वरदशंकर व्रत कथन करिता
झाला. ५१ तेव्हां सर्व राक्षस हर्ष पावले. आणि तो दशानन त्या राक्षसांसहवर्तमान, कुबेरानें पालन केलेल्या लंकेला शीघ्र गेला.
५२ आणि तो भयंकर पराक्रमी रावण लंका नगरीला वेढा घालून अति घोर युद्ध करून कुबेरास जिंकून ५३ तो राक्षसेश्वर राव-

मातरं पुनरागत्य कैकशीं दैत्यसंयुताम्॥ ननाम शिरसा चैव व्रतं चाकथयत्स्वयम्॥५१॥ ज-
हृषू राक्षसाः सर्वे तैः समेतो दशाननः॥ जगाम लङ्कामचिरात्कुबेरेणानुपालिताम्॥५२॥ रु-
रोध दिव्यां नगरीं राक्षसो भीमविक्रमः॥ जित्वा वैश्रवणं चैव कृत्वा युद्धं सुदारुणम्॥५३॥
आससादासनं दिव्यं लङ्कायां राक्षसेश्वरः॥ जित्वा त्रैलोक्यमखिलं सर्वकामसमृद्धिमान्॥
बभौ राक्षसवर्यश्च वरदस्य प्रसादतः॥५४॥ अगस्त्य उ०॥ ततः किमकरोत्स्कन्द कुबेरो राक्ष-
सैर्जितः॥

ण लंकेंत उत्तम राज्यासनावर बसला. नंतर सर्व त्रैलोक्य जिंकून सर्व विषयसमृद्धीनें संपन्न होत्साता तो रा- १६
वण वरदशंकरप्रसादानें शोभूं लागला. ५४ अगस्त्यमुनि प्रश्न करितो, हे कार्तिकस्वामिन्, कुबेराला राक्षसानीं जिंकलें असतां नं-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तर त्यानें काय केलें? ती कथाश्रवण करण्यास मी इच्छितों. कारण मला त्या कथाश्रवणाविषयीं परम उत्कंठा वाटत आहे. ५५ ते व्हां स्कंद सांगतात. कुबेराचें राज्य हरण झालें असतां तो भूतळावर भ्रमण करूं लागला. असा इतस्ततः फिरत असतां त्यास कोठेंही सुख होईना. ५६ त्या काळीं कुबेर ह्मणतो, कोणत्या कर्मविपाकानें या दुःखाचा नाश होईल तें कारण मी जाणत नाहीं.

तत्कथां श्रोतुमिच्छामि परं कौतूहलं हि मे ॥५५॥ स्कन्द उवाच ॥हृतराज्यः कुबेरस्तु बभ्राम पृथिवीतले ॥ इतश्चेतश्च धावन्वै लेभे सौख्यं न कुत्रचित् ॥ ५६ ॥ कुबेर उवाच ॥ केन कर्मविपाकेन दुःखस्यास्य पराजयः ॥ भवेत्तत्कारणं चैव न जानामीति दुःखितः ॥ ५७ ॥ नैव मित्रं नैव सौख्यं दरिद्रस्यानुधावतः ॥ करुणापरो देवदेवः कथं मां समुपेक्षते ॥ ५८ ॥ अद्याहं तोषयिष्यामि दिव्येन तपसा शिवम् ॥ लङ्काराज्याधिकं सौख्यं याचयामि सदाशिवम् ॥ ५९ ॥

५७. कारण इकडे तिकडे धांवणाऱ्या दरिद्यास मित्र मिळतच नाहीं. सौख्यही प्राप्त होत नाहीं. परंतु करुणाकर देवाधिदेव माझी उपेक्षा कशी करितो! ५८ तर आज मी उत्तम तपानें शिवास प्रसन्न करीन. आणि सदाशिवास लंकाराज्यापेक्षां अधिक सौख्याची प्रार्थना करीन ५९

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अशी सौम्य बुद्धि करून कुबेर कैलासपर्वताच्या उपवनांत गेला. आणि त्या उपवनाच्या मध्यभागीं जाऊन उत्तम महातप करूं लागला. ६० असें परमात्मस्वरूप शिवसंतोषार्थ बहुत काल तप करीत असतां जेव्हां सिद्धि होईना तेव्हां कुबेर चिंताक्रांत झाला. ६१ इतक्या संधींत तेथें दधीचि नामानें प्रसिद्ध ऋषि आला. तो महामुनि याच्या दैवानें आणिला. ६२. त्यास पाहून विश्रव्याचा पुत्र कुबेर मनांत उत्कंठित होऊन त्या

इति कृत्वा मतिं सौम्यां कैलासोपवनं ययौ ॥ तपश्चचार सुमहत् तत्रोपवनमध्यगः ॥ ६० ॥ बहुकालं तपस्तप्तं शिवस्य परमात्मनः ॥ नैव सिद्धिर्यदा जाता तदा चिन्तापरोऽभवत् ॥ ६१ ॥ एतस्मिन्नन्तरे तत्र दधीचिर्नाम नामतः ॥ ऋषिस्तत्रागमच्चास्य दैवानीतो महामुनिः ॥ ६२ ॥ तं दृष्ट्वा चोत्सुकमनाः कुबेरो विश्रवः सुतः ॥ प्रशस्य तमृषिं भूयः शिवभक्तं महामुनिम् ॥ ६३ ॥ नमस्कृत्वा तु संपूज्य शास्त्रदृष्टेन कर्मणा ॥ पप्रच्छागमनं तस्य कुतः स्थानादिहागमः ॥ ६४ ॥

शिवभक्त महा मननशील ऋषीची वारंवार प्रशंसा करून ६३ शास्त्रविहित कर्मानें त्याची नमस्कारपूर्वक उत्तम पूजा करून कुबेरानें त्यास आगमनाविषयीं प्रश्न केला कीं, आपण कोणत्या स्थानाहून येथें आलां? ६४ ॥ ॥७॥ ॥७॥ ॥७॥ ॥७॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्या कालीं दधीचि ऋषि भक्तीनें मस्तक नम्र केलेल्या त्या कुबेरास बोलला. तें भाषण असें कीं, दधीचि ह्मणतो हे कुबेरा, स्वस्थचित्त हो ऊन ऐक. तें असें कीं, लंकेंत रावणानें ६५ वरदशंकर व्रत करण्यासाठीं मला बोलावल्यामुळें मी लंकापुरीला गेलों. तेव्हां परमात्मस्वरूप देवाचें तें उत्तम व्रत तेथें केलें. ६६ नंतर रावणानें निरोप दिला असतां मी कैलासास प्राप्त झालों. तो तुला तप करितांना पाहिल्याव

तदा ऋषिरुवाचैनं भक्तिनम्रात्मकंधरम् ॥ दधीचिरुवाच ॥ शृणुष्वावहितो भूत्वा लङ्कायां रावणे-
न वै ॥६५॥ वरदेशव्रतं कर्तुमाहूतोगामहं पुरीम् ॥ तत्र कृतं व्रतं दिव्यं देवस्य परमात्मनः ॥ ६६॥ राव-
णेनाभ्यनुज्ञाते कैलासं प्राप्तवानहम् ॥ तपन्तं त्वामथालोक्य प्राप्तोऽस्मि तव दर्शनात् ॥ ६७॥ किमर्थं
तप्यसे तात तन्मूलं वद साम्प्रतम् ॥ कुबेर उवाच ॥ दर्शनं भवतां विद्वन् सर्वाघौघनिवारणम् ६८
अद्य मे तपसः सिद्धिर्जाता वो दर्शनाद्ध्रुवम् ॥ शृणु मत्कारणं स्वामिन् यदर्थमिह चागतः ॥ ६९ ॥

